## बँकांकडून स्मार्टकार्डसचे वितरण

डी बी ओ डी. क्र. एफ एस सी. बीसी. ८८/ २४.०१.०११ ए/ २००१-०२

एप्रिल ११, २००२

सर्व अनुसूचित वाणिज्य बँकां
( आर आर बीज सोडून )

प्रिय महोदय,

**<u>बँकांकडून स्मार्टकार्डसचे वितरण</u>**

परिपत्रक डीबीओडी. क्र. एफ एस बी. बीसी. १२३/ २४.०१.०१९/ ९९-२००० दिनांक १२ नोव्हेंबर १९९९ (परिशिष्ट-I- बाब ३- ग्राहकांची अर्हता ) मधील, निदेशांच्या अनुसार, इतर बाबींबरोबर, चांगली आर्थिक पत असलेल्या व किमान सहा महिने समाधानकारक खाते व्यवहार असणाऱ्या त्यांच्या ग्राहकांना स्मार्ट / डेबिट कार्डस देण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

२. पुनरावलोकनानंतर असे ठरविण्यात आले की, चांगली पत असलेल्या व सहा महिन्यांपेक्षा कमी काळ खाते असलेल्या, त्यांच्या निवडक ग्राहकांना बँका स्मार्ट कार्डस ( ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्हीही ) देऊ शकतात. मात्र, मोठ्या रकमेच्या बँक फसवणूकींच्या अभ्यास गटाने तयार केलेल्या व परिपत्रक क्र. डीबीएस. एफ जी व्ही. बीसी. ५६/२३.०४.००१/ ९८-९९ दिनांक २१ जून १९९९ द्वारा बँकांकडे पाठविलेल्या अहवालामधील परिच्छेद ९.२ मध्ये दिल्याप्रमाणे, बँकांनी, ' तुमचा ग्राहक ओळखा' ही संकल्पना अमलात आणली असावी. तथापि डेबिट कार्डांची ऑफ-लाईन पध्दती कार्यान्वित करणाऱ्या बँकांनी, अशा ग्राहकांनी त्यांची खाती किमान सहा महिने समाधानकारक रितीने चालविली आहेत इकडे लक्ष द्यावे.

३. सोबत जोड्लेल्या स्लिप अनुसार, मॅन्युअल इन्स्ट्रक्शन्स, व्हॉल्युम I पार्ट II च्या जून ३० पर्यंत संशोधीत, बाब क्र. ३ मधील परिच्छेद १५.११ मध्ये कृपया सुधारणा करण्यात यावी.

४. कृपया पोच द्यावी

आपला विश्वासू
(सी आर मुरलीधरन)
मुख्य महाव्यवस्थापक

स्लिप
(मॅन्युअल इन्स्ट्रक्शन्स - डी बी ओ डी . डी बी एस, आणि २००२ च्या आय सी ई डी- एफ एस सी- बीसी, ८८)

परिशिष्ट- I
परिच्छेद १५.११

३. ग्राहकांची अर्हता

चांगली पत असलेल्या व सहा महिन्यांपेक्षा कमी काळ खाते असलेल्या, त्यांच्या निवडक ग्राहकांना बँका स्मार्ट कार्डस ( ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्हीही ) देऊ शकतात. मात्र, मोठ्या रकमेच्या बँक फसवणूकींच्या अभ्यास गटाने तयार केलेल्या व परिपत्रक क्र. डीबीएस. एफ जी व्ही. बीसी. ५६/२३.०४.००१/ ९८-९९ दिनांक २१ जून १९९९ द्वारा बँकांकडे पाठविलेल्या अहवालामधील परिच्छेद ९.२ मध्ये दिल्याप्रमाणे, बँकांनी, ‘‘तुमचा ग्राहक ओळखा’’ ही संकल्पना अमलात आणली असावी. तथापि डेबिट कार्डांची ऑफ-लाईन पध्दती कार्यान्वित करणाऱ्या बँकांनी, अशा ग्राहकांनी त्यांची खाती किमान सहा महिने समाधानकारक रितीने चालविली आहेत इकडे लक्ष द्यावे.

व्यक्ति, कॉर्पोरेट संस्था आणि कंपन्या त्यांनी बचत/चालु / बध्दकालीन ठेवींच्या खात्यात अंगभूत तरलता ( बिल्ट-इन लिक्विडिटी ) ठेवलेली असल्यास त्यांच्यासाठी देखील ही स्मार्ट कार्ड / डेबिट कार्ड सुविधा बँका देऊ शकतात. परंतु स्मार्ट कार्ड/ डेबिट कार्ड सुविधा, कॅश क्रेडिट/ कर्ज खाते असलेल्यांना दिली जाऊ नये. तथापि, जेथे चेक द्वारा व्यवहार केला जातो, अशा वैय्यक्तिक कर्ज खात्यांच्या बाबतीत, बँका ऑन-लाईन डेबिट कार्डस देऊ शकतात.